# आर्थिक विकासात महिला उद्योजकता - एक अभ्यास

**डॉ. सपना रा. वेगीनवार**
सह्योगी प्राध्यापक
सरदार पटेल महाविदयालय, चंद्रपूर
**Email:**-dr.srweginwar@gmail.com

---

***संकल्पना:-***

*उद्योग हा देशाचा आर्थिक कणा आहे. देशाची आर्थिक स्थिती ही देशाचा औद्योगिक विकास व जीडीपी वर अवलंबून असते. जीडीपी वाढविण्याकरिता महिलांमधील उद्योजकता निर्माण करणे गरजेचे आहे. गरज शोधाची जननी आहे तर परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. उद्योगात पुरुषांची मक्तेदारी असणाऱ्या क्षेत्रात आज स्त्रिया ही खांद्याला खांदा लावून भरारी घेत आहे. अजूनही उद्योगांमध्ये स्त्रियांची संख्या कमी असली तरी ज्या स्त्रियां उद्योगात पाऊल टाकीत आहे त्यांचे कार्य नेत्र दीपक आहे.महिलांनी प्रतिकूल परिस्थितींना तोंड देऊन पुरुषांच्या वर्चस्वाला न जुगारता आज ठामपणे उद्योगांमध्ये आपले वर्चस्व स्थापले आहे. स्वयंरोजगारासाठी शिक्षण हेच वाणिज्य शाखेचे ब्रीदवाक्य आहे. रोजगार मागण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा, हीच संकल्पना महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देते.*
*बीजशब्द: जीडीपी, अग्रणी, आत्मनिर्भर, व्यवस्थापन, कौशल्य, स्वयंरोजगार, आर्थिक सक्षमीकरण*

---

**प्रस्तावना :-**

आतंकवाद ,नक्षलवाद ,राग ,इर्षा ,मत्सर अशा नकारात्मकतेने गुंफलेल्या देशात अजून एक मोठी समस्या देशासमोर आहे ती म्हणजे बेरोजगार.बेरोजगारीच्या विळख्यातून बाहेर काढण्याकरिता आपल्याला उद्योगाला प्रोत्साहन दिले पाहिजे. उद्योगामधूनच स्वयंरोजगाराची निर्मिती होते. स्वयंरोजगार निर्मितीसाठी आज सर्वांना प्राधान्य दिले पाहिजे,त्यात स्त्रियांना पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे .आज सर्वत्र स्त्री सबलीकरणाचे वारे वाहत आहे. महिलांनी आज घराची चौकट ओलांडून 'चूल आणि मूल' ही संकल्पना झुगारून घराच्या बाहेर आपले अस्तित्व टिकवित आहे . मॅक्लेलड यांच्या मतानुसार जन्म:ताच प्रत्येक बालकांमध्ये उद्योजकीय गुणांचे संवर्धन झालेले असते .प्रत्येकाने आपल्यामध्ये असलेले गुण ,कौशल्य, नाविन्यता ओळखावी त्यांना प्राधान्य देऊन विकास करावा. पुरुषांच्या मते मक्तेदारी असणाऱ्या उद्योग क्षेत्रात आज महिलाही खांद्याला खांदा लावून भरारी घेत आहे .पूर्वी हे क्षेत्र पुरुषांचे, व हे क्षेत्र महिलांचे असे वर्गीकरण होत असे परंतु आज सर्वच क्षेत्रात महिला आपले पाय रोवताना दिसत आहे आणि उत्तुंग भरारी घेत आहे. उदाहरणार्थ:- पायलट, मोटर वुमन, एव्हिएशन, संरक्षण, समाजकारण ,राजकारण, व्यवस्थापन, कला ,नाट्य इत्यादी क्षेत्रात काम करीत आहे.आज देशाच्या आर्थिक विकास व जीडीपी वाढविण्याकरता महिलांना उद्योग स्थापनेकरिता प्रशिक्षित करीत आहे. तसेच विविध सोयी सुविधा व योजना देऊन त्यांना सक्षम करीत आहे.

**उद्देश:-**

1) उद्योजकतेमुळे महिलांना आत्मनिर्भर करणे.

२) महिलांना आर्थिक व सामाजीकदृष्ट्या स्थान प्राप्त करणे.

**गृहीत कृत्य -**

1) उद्योजकतेमुळे महिला आत्मनिर्भर झाल्या आहेत.

२) उद्योजकतेमुळे समाजातील महिलांचे स्थान प्रबळ झाले आहेत.

**महत्व :-**

देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय उत्पन्न आणि उत्पादकता हे महत्त्वाचे घटक आहे. उत्पादकता वाढविण्याकरता उद्योगांना महत्त्वाचे स्थान आहे. आर्थिक विकास करताना केंद्रबिंदू म्हणून मनुष्यबळ महत्त्वाचे आहे .आर्थिक विकास घडवितांना स्त्रियांना प्राधान्य दिले तर सर्वतोपरी आर्थिक विकास होऊ शकतो .राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकता एक महत्वाचा स्त्रोत आहे. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन संघटन व व्यवसायाशी संबंधित बाबींमध्ये वेगवेगळ्या दिशा निश्चित करीत आहे. आज असे कुठलेच क्षेत्र नाही की , ज्यात महिलांचा सहभाग नाही म्हणूनच महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचे व तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय ठरला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांना आरक्षण दिले आहे .महिलांना आरक्षण देणारे महाराष्ट्र हे अग्रणी राज्य आहे. केंद्र सरकारच्या २०११ च्या सर्वेक्षणानुसार दर १००० जनतेच्या मागे 3 लोकांना रोजगार तर ९९७ बेरोजगार आहेत. अशा बेरोजगारांना स्वयंरोजगार लघु ,कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे .त्यासाठी केंद्र सरकारने २००१ मध्ये महिला विषयक धोरण आणले. महाराष्ट्राने २०११ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था यात महिलांचे सहभाग वाढविणारे विधेयक संमत केले .महिलांसाठी योजना आणल्या ग्रामीण तथा शहरी महिलांनी धाडस करून आत्मनिर्भर बनवून लघु व कुटीर उद्योग क्षेत्रात पाय रोवण्यास प्रारंभ केला व त्यांच्या या वाटचालीमुळे अनेक बेरोजगारांना रोजगार मिळाला व अनेक बेरोजगार आत्मनिर्भर बनले. आर्थिक विकासात महिलांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.आजही महिलांना लिंगभेद समाजात दिले जाणारे गौण स्थान तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव उद्योग सुरू करण्यासाठी अपुरे आर्थिक स्त्रोत, गुंतवणूक सहाय्य, योग्य व सुरक्षित जागा अशा अनेक बाबी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने महिलांच्या विकासासाठी आणि राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी "महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण २०१७" जाहीर केले. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर हे धोरण महिलांना सक्षम करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरते. सूक्ष्म, लघु व कुटीर उद्योगांना महिलाना प्रोत्साहन देण्याकरिता राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजना व सवलती देतात.

**1) विशेष प्रोत्साहन योजना २०१३:-**

सामूहिक प्रोत्साहन ,भांडवली अनुदान, वीजदर अनुदान, व्याजदर अनुदान, कामगार कल्याण सहाय्य

**2) समर्पित जागा निर्माण करणे:-**

अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भूखंडाचे आरक्षण, जागा राखीव ठेवणे, उबवन केंद्र, Incubation centre

**3) स्पर्धात्मकता वाढविणे :-**

समूह विकास केंद्र, महाराष्ट्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम व महिला विकसन, महिलांसाठी पायाभूत सुविधा विकसित योजना पुरस्कार व कौतुक उद्योग

**४) विशेष मैत्रीमध्ये कक्ष**

**५) साहस भांडवल निधी :-**

उद्योजकता व कौशल्य विकास होऊन देशाचा नव्हे तर राज्याचा आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात

हातभार लागतो. विकसनशील राष्ट्रात तर हातभार हा अतिशय मोलाचा ठरतो. आज उद्योग क्षेत्रात अनेक महिला उच्च पदावर काम करीत आहे तसेच अनेक लोकांना रोजगार निर्माण करून देत आहे त्या काही उद्योजक महिलांची माहिती प्रत्येक महिलेला प्रेरणा देणारी व त्यांच्या उंच भरारी ने प्रत्येक महिलेला यशस्वीतेची वाट दाखवणारी ठरू शकते.

प्रसिद्ध महिला उद्योजिका व त्यांचे कार्य

१)इंद्रा राजकिशन नुथा

चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी पेप्सीका

कार्य :-

- जगाच्या पहिल्या पेजरच्या मानकरी जगातील शंभर शक्तिशाली महिलात त्यांचे तेरावे स्थान होते. २००६ ला सर्वात शक्तिशाली महिला व्यावसायिक म्हणून नाव घोषित करण्यात आले.
- युनायटेड टेलिव्हिजनच्या मुख्य अधिकारी झरीना स्कूवाला या साप शिडी या रियालिटी पहिल्या प्रसिद्ध शोच्या मानकरी ठरल्या.
- ३)मीनल मोहाडीकर -
  "आम्ही उद्योगिनी" या संस्थेची स्थापना व ही संस्था सर्वसामान्य उद्योगिनी साठी प्रदर्शनाच्या द्वारे व्यासपीठ देते.
- वंदना लुथरा, संस्थापक व्हीएलसीसी हेल्थकेअर लिमिटेड
  कार्य:- सुंदर दिसणे हे प्रत्येक महिलेचे स्वप्न यासाठी डायटिंग जिम जाणे याचे शास्त्रोक्त मार्गदर्शन करणारी देशातील अग्रगण्य संस्था होय. व्हीएलसीसी या संस्थेद्वारे प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेचे अभ्यासक्रम चालवतात.
- रोशनी नादर मल्होत्रा कार्यकारी संचालक, आणि मुख्य कार्यकारी अधिकारी एच. सी. एल.

कार्य:- व्यवसायात बदल घडवून आणण्यासाठी एच सी एल इन्फोसिस्टेम आणि एच सी एल टॅलेंट ट्रेनिंग डीविजन सुरू केले आणि नवीन तंत्राला आयाम दिला.

- संगीता पेडूरकर व्यवस्थापकीय संचालिका केलॉग इंडिया एफ आय सी सी आय फूड प्रोसेसिंग कमिटी च्या अध्यक्ष आहेत.
  कार्य:-घराघरात आवडीने खाल्ले जाणारे केलॉग इंडियाच्या संस्थापीका आहेत. पक्स गुड्स फॉरमेसीटीकल आणि वित्त सेवा या तीन क्षेत्रात मार्केटिंग सेल्स अँड मॅनेजमेंट बघतात.
- प्रीती रेड्डी व्यवस्थापकीय संचालिका अपोलो हॉस्पिटल.
  कार्य:- भारतातील सर्वात मोठ्या रुग्णालयापैकी एक म्हणून अपोलो हॉस्पिटल ची गणना आहे.
- स्वाती अजय पिरामल, उपाध्यक्ष पिरामल ग्रुप
  कार्य:- ही संस्था औषध आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करणारी कंपनी आहे.
- किरण मुजुमदार शॉ अध्यक्ष, व व्यवस्थापकीय संचालक बायोकॉन लिमिटेड.

कार्य:- बंगलोर स्थित जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्य करणारी बायोकन लिमिटेड कंपनी.

- अनू आगा चेअरमन माजी अध्यक्ष थरमॅक्स लिमिटेड .
  कार्य:- थरमॅक्स लिमिटेड तसेच टीच फॉर इंडिया या सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष आहे.

- ममता राठी संस्थापक द क्रिएशन
  कार्य:- बेस्ट ग्लास शोरूम ह्या काचेवर कलाकुसर करण्यास तज्ञ आहेत. बेस्ट क्रिएटिव्ह अँड इनोव्हेशन नॅशनल अवॉर्ड मिळाला आहे.

- सलुजा फिरोदिया मोटवानी, जॉईन एमडी कायनेटिक एनर्जी
  कार्य:- कायनेटिक होंडा मधून कायनेटिक ही वेगळे निघाल्यानंतर कायनेटिक ब्रँड ला नवीन रूप देण्याकरता त्यांनी अथक परिश्रम घेतले.

- संगीता सिंह, व्हाईस प्रेसिडेंट विप्रो टेक्नॉलॉजी
  कार्य: विप्रोला ग्लोबल ब्रँड बनविण्याकरता त्यांनी सातत्याने धडपड केली

- .पल्लवी आणि कृतिका गोपीनाथ डेक्कन चार्टर
  कार्य :-लो कॉस्ट एअरलाइन्स चे आघाडीचे नाव" हम भी कुछ कम नही" हे दाखवून दिले.

- प्रीती अदानी संस्थापक अदानी ग्रुप.
  कार्य:- अब्जावधींची टन टर्न ओव्हर असणाऱ्या अदानी ग्रुपच्या फाउंडेशन यशस्वीरित्या चालवणाऱ्याच्या या उद्योजिका.

आज या माध्यमातून कितीतरी उद्योजीका घडल्या आहेत .व्यवसायात लागणारी अंत: प्रेरणा ज्वलंत इच्छाशक्ती आणि निर्णय क्षमता नवनवीन कल्पना मांडतात .त्यात नवीन प्रॉडक्टस तयार होतात. एक महिला उभी राहिली की तिच्यामागे अनेक महिला उभ्या राहतात यातूनच अविष्कार जन्मास येतो. यावरून लक्षात येते की ,तुम्ही एक पाऊल टाका नक्कीच यश तुम्हाला मिळेल. याचेच उदाहरण म्हणजे टाटा मोटर्स या कंपनीत फोरमन पासून तर वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत पूर्ण कंपनी ही महिला चालवतात आणि महिला सर्व पूर्ण कार्य करतात हे सर्वात मोठं उदाहरण आपल्यासमोर आहे.

**महिला उद्योजकांच्या अडचणी:-**

- महिलांना चूल आणि मूल म्हणजेच कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पडताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.
- महिलांना लिंगभेद समाजातील गौण स्थानामुळे तिच्या यशस्वीतेबद्दल अविश्वास असतो.
- तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव ही पण एक मोठी समस्या उद्भवते .
- मर्यादित आर्थिक स्त्रोत व गुंतवणुकीची सहाय्यतेचा अभाव असतो, व व्यावसायिक जागांचा आणि काही तांत्रिक गोष्टीचा अभाव

महिला उद्योजकांना या वरील समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे अनेक अडचणींना मात करून यशस्वीपणे वाटचाल करणारी आणि खंबीरपणे सर्व समस्यांना मात करून यशस्वीपणे भरारी घेणाऱ्या महीला या यशस्वी उद्योजिका होऊ शकतात व देशाच्या आर्थिक विकासात व जिडीपी मध्ये हातभार लावून विकसनशील देशातून

विकसित देशाकडे परिवर्तन करण्याकरिता बदल करू शकतात.

**निष्कर्ष:-**

महिला ज्याप्रमाणे "चूल आणि मुल"ही जबाबदारी यशस्वीपणे सांभाळतात. त्याचप्रमाणे उद्योग, व्यवसाय क्षेत्रातही त्या यशस्वी होताना दिसत आहे. अजूनही खुप महिलांना सरकारच्या विविध सोयी सुविधा सवलती माहिती बाबत अज्ञानी आहेत. अनेक महिला उद्योगाकडे पाऊल टाकतांना घाबरतात. परंतू व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाकडे मुलींचा ओढा वाढतांना दिसत आहे. नवनवीन कल्पना, सहनशक्ती,निर्णयक्षमता, स्त्रिस्वतंत्र्या हे गुण जन्मजात स्त्रियांकडे असतात फक्त त्याला खतपाणी व प्रोत्साहन देण्याची गरज आहे. उद्योगात स्त्रियांचा समावेश हेच उन्नतीचे लक्षण आहे.सूक्ष्म, लघु , कुटीर व मोठ्या उद्योगामुळे देश आर्थिक दृष्ट्या सुदृढ व प्रगती पथावर वाटचाल करील यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ:-**


- उद्योजक, मार्च २०२०, जागतिक महिला दिन विशेषांक.
- उद्योजक,ऑगस्ट २०२१.
- राज्यातील महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण- २०१७ महाराष्ट्र शासन,
- उद्योग ,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय, क्र. साप्रोयो- २०१७/प्र.क्र.१५ / उद्योग-८
- उद्योग ,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय, क्र. साप्रोयो- २०१३/प्र.क्र.५४ / उद्योग-८ दिनांक १/०४/२०१३.
- अर्थव्यवस्थेतील महिला उद्योजकांची भूमिका, “नॉलेज रेझोनन्स”,डॉक्टर भारती सुदर्शन गोस्वामी,संशोधन लेख .


Research Hub